॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

जून २०२३

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org







आसुसले मन । भेटण्या हरीला ।
निघालो वारीला । पंढरीच्या ॥
जगायचे कसे । प्रश्नावर प्रश्न ।
परी मन धावे । त्याच्याकडे ॥
वाट नाही सोपी । जाण मला याची ।
देईल हिंमत । हरी माझा ॥
दर्शनाने त्याच्या । मन शांत होते ।
चित्त त्याचे पायी । लागे माझे ॥
भजनात त्याच्या । मन होई दंग ।
सरते मळभ । अंतरीचे ॥
वारी देवा तुझी । सुखाची झुळूक ।
झुंजण्याचे बळ । देई सर्वा ॥
वारीचा संकल्प । तुटू नये कधी ।
इतकाच मिळो । आशिर्वाद ॥

- शिरीष पटवर्धन

# शाखा विभाग - उन्हाळी शिबिर

**लहान गट - कालावधी ३ मे ते ७ मे, स्थळ - लोकसेवा ई-स्कूल, पाषाण.**
**विषय - छत्रपती शिवाजी महाराज, शिबिरार्थी संख्या - ११५**

| विषय | ३ मे | ४ मे | ५ मे | ६ मे | ७ मे |
|---|---|---|---|---|---|
| प्रबोधन | | शिबिर गीत वक्ते - सुमित डोळे | शिबिर गीत वक्ते - सुरेश पवार | शिबिर गीत वक्ते - किरण ननावरे | शिबिर गीत वक्ते - निलेश धायरकर |
| व्याख्यान सत्र | एकत्रीकरण | साल्हेर रणसंग्राम - सौरभ करडे | जिजाऊ आणि शिवबा, संस्कार - श्री. मोहन शेटे | समर्पणाची शर्थ - किरण ननावरे | समारोप |
| कृतीसत्र | उद्घाटन कार्यक्रम | चलो दिल्ली | Team Building activity | खजिना शोध | |
| प्रेरणासत्र | चित्रपट भाग १ - बोक्या सातबंडे | शिवराय आणि साहस - श्री. चिंचकर | संघटक शिवाजी महाराज - श्री. महेश पवळे | छत्रपतीशिवाजी महाराज आणि त्यांची मूल्यं - श्री. निलेश धायरकर | |
| रात्र कार्यक्रम | चित्रपट भाग २ | शक्ती बुद्धी | प्रश्नमंजुषा | नृत्य स्पर्धा | |

◆ **व्याख्याने** - उद्घाटन सत्रात श्री. बापू शिंदे यांनी 'शिवाजी महाराजांचे बालपण' व श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी 'शिवाजी महाराजांचे नियोजन' हे विषय मांडले. श्री. प्रमोद बोराडे यांनी 'शिवाजी महाराज व साहस' हा विषय कवितेतून मांडला. यातून महाराजांचे बालपण, अफझलखान वधाची पूर्वतयारी, महाराजांची दूरदृष्टी ही वैशिष्ट्ये त्यांनी सांगितली. श्री. मोहन शेटे सरांनी 'जिजामाता व शिवबा' हा विषय कथाकथनातून मांडला. साहसी जिजामातेच्या संस्कारातूनच महाराष्ट्रात सत्तेवर असणाऱ्या पाच मुस्लिम घराण्यांशी त्यांनी दिलेली टक्कर हा इतिहास मुलांना समजला. 'संघटक छत्रपती शिवराय' हा विषय श्री. महेश पवळे यांनी मांडताना लहानपणापासूनच शिवरायांनी घरोघरी जाऊन जमवलेल्या मावळ्यांच्या गोष्टी ऐकताना नकळत संपर्क कसा असावा हा संस्कार मुलांच्यावर झाला.

'छत्रपती शिवरायांचा त्रिवार जयजयकार' ह्या पद्याच्या प्रत्येक कडव्याचा अर्थ वर्धिनीच्या युवा कार्यकर्त्यांनी मुलांना प्रबोधन सत्रात सांगितला. पद्य समजून घेताना ऐकलेल्या गोष्टींतून शिवरायांचे वेगवेगळे गुण मुलांना समजले आणि त्यामुळेच समारोप सत्रात याचे सादरीकरण अर्थपूर्ण झाले.

स्पर्धा व कृतीसत्र - विषयाला अनुसरून किल्ल्यांची व मावळ्यांची नावे लिहिणे, खजिना शोध, शिवपालखी सोहळा, मैदानी खेळ झाले.












**मोठा गट - कालावधी ३ मे ते ७ मे**

**स्थळ - भावे हायस्कूल, सदाशिव पेठ, पुणे, विषय - उद्योजकता विकास, शिबिरार्थी संख्या - १२०**

| विषय | ३ मे | ४ मे | ५ मे | ६ मे | ७ मे |
|---|---|---|---|---|---|
| प्रबोधन | | उपासना | उपासना पंचशील, बौद्ध पौर्णिमा - संदीप मोरे | उपासना चिकाटी सातत्य - पंकज मुंडे | उपासना |
| व्याख्यान | | Shark Tank (Video) उद्योगाचे गुण कौशल्य - सचिन वाडेकर | क्षेत्रभेट | उद्योग व उद्योजकांच्या कथा उद्योग मेळावा चर्चा, कलागुणदर्शन तयारी | समारोप सत्र |
| कृतीसत्र | एकत्रीकरण | ड्रोन (द्रोणाचार्य) | जाहिरात स्पर्धा तयारी | व्यवसाय पूरक खरेदी | |
| प्रेरणासत्र | उद्घाटन | सत्र उद्योगाचे - कैलास शिखर - मुलाखत शिवराज मिठारे (कैलास भेळ) मुलाखतकार - अरविंद केळकर | उद्योजक व्हायचंय मला-विजय नवले | उद्योग मेळावा | |
| रात्र कार्यक्रम | व्यवस्था, परिचय नियमावली, documentry | वादविवाद (नोकरी-व्यवसाय) | जाहिरात स्पर्धा | विविध कलागुणदर्शन | |

शिबिराच्या सुरुवातीला मुलांना विषयाची ओळख व्हावी या हेतूने समुपदेशन विभागाच्या प्रमुख सौ. मेघा नगरे यांनी 'माझी व्यवसायाची आवड' (बिझनेस इंटरेस्ट टेस्ट) ही कलचाचणी घेतली. यातून वेगवेगळ्या उद्योगांची व त्यातील विविध पर्याय यांची माहिती मिळाली.

**◆ व्यावसायिकांच्या मुलाखती -**

◆ 'कैलास जीवन'चे श्री. रामभाऊ कोल्हटकर यांची डॉ. विनेश नगरे सरांनी मुलाखत घेतली. यातून उद्योगाची सुरुवात कशी करावी, यासाठी कोणत्या गोष्टी, कौशल्ये आवश्यक असतात, त्याचे तंत्र व मंत्र यावर चर्चा झाली.

◆ 'उद्योगाचे शिखर कैलास' - कैलास भेळ, खेड शिवापूरचे श्री. व सौ. शिवराज मिठारे यांना श्री. अरविंद केळकर सरांनी बोलते केले. लहानपणच्या सवयीतून

लागलेली व्यवसायाची आवड, सुरू झाल्यावर आलेल्या अडथळ्यांवर केलेली मात आणि यातील पत्नीचे योगदान यातून व्यवसायपूरक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना झाले.

◆ समारोप सत्रात 'काका हलवाई'चे श्री. युवराज गाडवे यांच्या श्री. मंदार रायरीकर सरांनी घेतलेल्या मुलाखतीतून गेली १३१ वर्षे त्यांनी जपलेल्या परंपरेतून समृद्ध केलेल्या व्यवसायाची माहिती मिळाली.

◆ **स्पर्धा** – ◆ विविध व्यवसायांची पोस्टर बनवणे, इंटरनेटच्या माध्यमातून गुगल, टाटा ग्रुप, रिलायन्स ग्रुप, अदानी ग्रुप अशा व्यावसायिकांची माहितीचे गटशः सादरीकरण झाले. ◆ माझा व्यवसाय माझी जाहिरात – स्वतःला भावलेल्या व्यवसायाच्या विद्यार्थ्यांनी जाहिराती बनवल्या व याचे परीक्षण श्री. विलास कुलकर्णी व श्री. हेमंत भुजबळ यांनी केले.

◆ **चला भेटू या व्यावसायिकाला** – 'उद्योजकता विकास' होताना वेगवेगळे व्यवसाय कसे चालतात, त्यासाठी कसे कष्ट घ्यावे लागतात, कोणत्या गोष्टींचा आग्रह धरायला लागतो, अडचणींवर कशी मात करतात हे माहीत व्हावे म्हणून वर्धकांनी प्रत्यक्ष जाऊन वेगवेगळ्या सहा व्यवसायांची माहिती घेतली.

◆ **प्रत्यक्ष व्यवसायाचा अनुभव** – वर्धकांनी शिबिर स्थळाच्या बाहेर जाऊन परिसरात चिठ्ठीद्वारे निवडलेल्या व्यवसायाचा अनुभव घेतला. प्रत्येक गटाने व्यवसायाचे पूर्ण अंदाजपत्रक बनवले. त्यांना काही रक्कम भांडवल म्हणून दिली होती. अजून रक्कम हवी असल्यास कर्ज कसे घ्यावे याची माहिती दिली. साहित्य खरेदीसाठी गटातून दोघांनी जबाबदारी घेऊन ठराविक वेळात हे काम केले. त्यानंतर दुपारी ४ ते ८ ठरलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्येक गटाने यशस्वीरीत्या व्यवसायाचा अनुभव घेतला.













| गट क्र. | व्यवसाय | भांडवल रक्कम रुपये | विक्री रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | ॲपल ज्यूस | १,००० | १,००० |
| २. | चहा | १,००० | ९५० |
| ३. | सरबत, पेन, बुक | १,३०० | १,००० |
| ४. | कुल्फी | १,७७० | १,७७० |
| ५. | पाणी बॉटल | १,००० | १,००० |
| ६. | मसाला ताक | १,५०० | १,५०० |

| गट क्र. | व्यवसाय | भांडवल रक्कम रुपये | विक्री रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ७. | लोणचे, पापड, मसाले | २,००० | १,००० |
| ८. | लिंबू सरबत | १,००० | १,००० |
| ९. | मसाला ताक | १,००० | १,००० |

◆ **उत्कृष्ट शाखा चषक** – समारोप सत्रात लहान व मोठ्या गटाचे एकत्रीकरण झाले. जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात वेगवेगळ्या शैक्षणिक कौशल्यांवर आधारित झालेल्या उपक्रमांच्या नियमित परिक्षणातून 'उत्कृष्ट शाखा चषक' स्पर्धेसाठी शाखांना गुणानुक्रम देण्यात आले. चषकाचे वितरण श्री. युवराज गाडवे यांच्या हस्ते झाले.
प्रथम क्रमांक – स्वामी दयानंद सरस्वती शाखा, द्वितीय क्रमांक – समर्थ रामकृष्ण शाखा, तृतीय क्रमांक – धर्मवीर शंभूराजे शाखा, उत्तेजनार्थ – भगिनी निवेदिता शाखा.
तसेच केंद्रीय स्तरावर झालेल्या इतिहास, भूगोल प्रश्नमंजूषा, प्रकल्प लेखन, विज्ञान दिन स्पर्धांमधील विजेत्या शाखांना बक्षीसे देण्यात आली.

| प्रश्नमंजूषा स्पर्धा | इतिहास | भूगोल |
|---|---|---|
| इ. ५ वी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा<br>स्वामी शिवानंद शाखा | – |
| इ. ६ वी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | स्वामी दयानंद सरस्वती शाखा |
| इ. ७ वी | स्वामी श्रद्धानंद शाखा<br>स्वामी अभेदानंद शाखा | धर्मवीर शंभूराजे शाखा |
| इ. ८ वी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा (प्रथम)<br>स्वामी सुबोधानंद शाखा (द्वितीय)<br>राजर्षी शाहू शाखा (तृतीय) | – |
| इ. ९ वी | स्वामी दयानंद सरस्वती शाखा (प्रथम)<br>धर्मवीर शंभूराजे शाखा (द्वितीय)<br>राजर्षी शाहू शाखा (तृतीय) | – |

◆ **प्रकल्प लेखन स्पर्धा** – प्रथम – स्वामी ब्रह्मानंद शाखा, द्वितीय – रामकृष्ण शाखा, तृतीय – धर्मवीर शंभूराजे शाखा.

◆ **विज्ञान दिन स्पर्धा** –

लहान गट – इ. ५ वी ते ७ वी

प्रथम – चैतन्य शिंदे, द्वितीय – प्रतीक चव्हाण, श्रीओम गंगणे, तृतीय – आयुष दुधाने, वैभव एकनुरे (सर्व वर्धक – स्वामी दयानंद सरस्वती शाखा)
मोठा गट – इ. ८ वी ते १० वी – प्रथम – सुदीप दिवटे, अथर्व बडदे (स्वामी दयानंद सरस्वती शाखा), द्वितीय – स्वामी अभेदानंद शाखा, तृतीय – आर्य शेरला, किसन गौतम, मंदार पवार (स्वामी श्रद्धानंद शाखा)

## युवा विभाग

◆ **युवक शिबीर – संख्या – ८५, कालावधी – १८ ते २१ मे, स्थळ – दिव्यांग कल्याणकारी संस्था, वानवडी**
शिबिराविषयी – वर्षभर युवक नव्या उत्साहात शाखेचे काम करत असतात पण त्याला नियोजनाची, अनुभवाची जोड दिल्यास शाखा कामात गुणवत्ता येईल या हेतूने या शिबिरात 'प्रशिक्षण' हे केंद्रस्थानी ठेवून विविध कृतीसत्रे, गटकार्य व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

दि. १८ मे २०२३
डॉ. संजय तांबट यांनी 'शाखा गाथा' या मालिकेतून युवकांचे प्रबोधन केले. वर्धिनीच्या स्थापनेपासून ते शाखा विस्ताराची साखळी व त्यामागील प्रेरणा असा विषय कार्याध्यक्षांनी प्रबोधनात मांडला. श्रीमती बागेश्री दीदी यांनी वर्धिनीचे काम, सहवासातून शिक्षण, सेवेकरी निर्माण यासाठी शाखा सूत्र कसे उपयुक्त ठरते असा विषय मांडला. श्री. सुमित डोळे यांनी औपचारिक व अनौपचारिक शिक्षण पद्धती, तिचे महत्त्व संवादातून सर्वांपर्यंत पोहोचवले.

◆ श्री. सुनील देवधर यांच्या 'भारतीय समाजापुढील आव्हाने' या विषयांतून अनेक कार्यकर्त्यांना आपल्या आजूबाजूला असलेले प्रश्न व त्यांच्या गांभीर्याचे भान आले.

दि. १९ मे २०२३
शाखेच्या कामाचे नियोजन करताना नियोजनाचे टप्पे काय आहेत याचे कृतीसत्र श्री. सुरेश पवार यांनी घेतले.

◆ श्री. मंदार अक्कलकोटर यांनी युवकांना प्रथमोपचाराचे प्रशिक्षण दिले. ज्यात आपत्कालीन स्थितीत हार्ट अटॅक आल्यास CPR कसा द्यावा व मैदानावर अशा संभाव्य घटना घडल्यास काय करावे याचे प्रशिक्षण दिले.

◆ श्री. भरत अमदापुरे यांनी प्रेरणा सत्रात

'भारतीय समाजापुढील आव्हाने' असा विषय मांडला ज्यामध्ये समाज म्हणून आपल्या आजूबाजूला घडण्याऱ्या घटनांची उदाहरणे देत त्यांनी जागरूक राहण्याचे संकेत दिले.

दि. २० मे २०२३

शाखेच्या घडणी प्रक्रियेतील एक महत्त्वाचा नित्य उपक्रम म्हणजे 'मानसिक विकास बैठक'. ही बैठक कशी घ्यावी, कशासाठी घ्यावी याचे प्रशिक्षण भागश: चर्चा व लेख वाचनातून घेण्यात आले. हे प्रशिक्षण श्री. विलास कुलकर्णी, डॉ. विनेश नगरे, श्री. संदीप मोरे, श्री. निशिकांत वाईकर, श्री. मंदार पोफळे यांनी घेतले. शाखेतील काम व दिलेली व्यवस्था उत्तम रीतीने पार पाडता यावी म्हणून व्यवस्थाश: त्यांचे प्रशिक्षण घेऊन शंकाचे निरसन करून त्यांच्या व्यवस्थेचे कामाचे स्वरूप (प्रोफाइल) देण्यात आले.

- युवकांना 'ड्रोन आचार्य' या संस्थेच्या श्री. अक्षय दादाने 'ड्रोन'संबंधी असलेल्या करियर विषयी मार्गदर्शन करून प्रत्यक्ष ड्रोन उडवून दाखवले.
- शाखा स्तरावर करत असलेले काम तंत्रज्ञानाद्वारे सोपे व्हावे म्हणून IT विभागामार्फत MS Teams चे प्रशिक्षण देण्यात आले. श्री. केदार भंडारी व श्री. शुभम जगताप यांनी सदर सत्र घेतले.
- प्रेरणा सत्रात 'हिंदू साम्राज्य दिनाने आपल्याला काय दिले?' हा विषय ह.भ.प. शिरीषजी मोरे यांनी मांडला. त्यांनी आजवर झालेल्या निजाम, औरंगजेब, खिलजी यांच्या आक्रमणाच्या कालखंडावर प्रकाश टाकला.

दि. २१ मे २०२३

भागश: नियोजन – भागश: व्यवस्थांचे नियोजन करण्यात आले.

समारोप सत्र – श्री. मुरलीधर कचरे यांनी दिव्यांग कल्याणकारी संस्थेविषयी माहिती सांगितली व यासोबतच संघ प्रचारक म्हणून काम करतानाच्या काही आठवणींना, अनुभवांना उजाळा दिला.


















# शाखा विभाग

## वर्धिका व युवती शिबिर

**कालावधी-२५ ते २८ मे, स्थळ-न्या. रानडे बालक मंदिर, विषय-स्वातंत्र्यवीर सावरकर, शिबिरार्थी संख्या-५५**

| विषय | २५ मे | २६ मे | २७ मे | २८ मे |
|---|---|---|---|---|
| प्रबोधन | | उपासना श्रीमती हर्षाली वाघोले- एकाग्रता | उपासना श्रीमती दीपाली थोरात - सातत्य व चिकाटी | उपासना श्रीमती हर्षा जैन - चांगल्या सवयी |
| व्याख्यान | | श्रीमती माधुरी जोशी- सावरकर आणि समरसता | श्रीमती किरण भट्टड - एक स्वप्नपूर्ती | |
| कृतीसत्र | एकत्रीकरण | चित्रकला स्पर्धा, प्रसंग सादरीकरण | 'त्रिवेणी' - नाटक मोठा गट स्थळभेट - छोटा गट | पद्य सादरीकरण |
| प्रेरणासत्र | उद्घाटन - श्री. मोहन शेटे - क्रांतीसूर्य सावरकर | श्री. शिरीष पटवर्धन - प्रेरणा कथा | श्रीमती तेजाली - शहासने - स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आठवणी जागवताना | समारोप - ॲड. नीलिमा गोखले |
| रात्र कार्यक्रम | चित्रपट - वीर सावरकर - भाग १ | चित्रपट - वीर सावरकर - भाग २ | प्रसंग नाट्य स्पर्धा | |

* **व्याख्याने -** ◆ शिबिराचे उद्घाटन श्री. मोहन शेटे सरांच्या 'क्रांतीसूर्य सावरकर' व्याख्यानाने झाले. सावरकरांचे प्रेरणादायी चरित्र सर्वांसमोर मांडले गेले. ◆ 'सावरकर आणि समरसता' हा विषय श्रीमती माधुरीताई जोशी मांडताना सावरकरांच्या आवडीच्या गोष्टी, त्यांचे बालपण यातील उद्‌बोधक प्रसंग सांगितले. ◆ श्री. शिरीष पटवर्धन सरांनी राष्ट्रभक्ती जागवणाऱ्या सावरकरांच्या प्रेरणादायी कथा सांगितल्या. ◆ सौ. किरणताई भट्ट्ड यांनी त्यांनी नुकत्याच पूर्ण केलेल्या 'एव्हरेस्ट बेस कँप'चे अनुभवकथन केले. यातून जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर असाध्य गोष्टी आपण साध्य करू शकतो हे सगळ्यांना जाणवले. ◆ मोठ्या गटातील वर्धिका व युवतींनी 'त्रिवेणी' हे नाटक पाहिले. स्वा. सावरकरांच्या पत्नी व त्यांच्या दोन्ही वहिनी यांचे समर्पण नाट्यमय प्रसंग, नृत्य, गीते यातून लक्षात आले. ◆ श्रीमती तेजाली शहासने यांनी फोटोच्या माध्यमातून सावरकरांनी भोगलेली अंदमानच्या सेल्युलर जेलमधली काळ्या पाण्याची शिक्षा कथन केली.

समारोप सत्रात ॲड. मा. निलिमाताई गोखले यांनी सावरकरांचे चरित्र थोडक्यात मांडले. नवीन शैक्षणिक वर्षासाठी शाखाशः कामाच्या युवतींच्या नियुक्त्या यावेळी जाहीर करण्यात आल्या.

* **कृतिसत्रे -** ◆ 'व्यक्तीचित्रं कशी काढावीत' हा विषय श्री. हर्षद दादा पेंढार यांनी छोटी छोटी चित्रे काढून समजून सांगितला व त्याप्रमाणे मुलींकडून चित्रे काढून घेतली. ◆ 'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट मुलींनी बघितला आणि त्यातील काही प्रसंगांचे गटशः सादरीकरण केले. ◆ लहान गटाची राजा केळकर संग्रहालयाला स्थळभेट झाली. दीपाताई, मनिषा ताई यांनी संग्रहित वस्तूंमागील इतिहास मुलींना सांगितला.












## समुपदेशन विभाग

सौ. शिल्पा ताई तांबे यांनी दि. ८ एप्रिल रोजी 'मानसिक आरोग्य' या विषयावर रुग्ण सहाय्यक पुणे वर्गातल्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, ''मन शांत असणे, इतरांबरोबर जुळवून घेणे, आपल्या प्रश्नांना आपणच उत्तर शोधणे, मनावर ताबा असणे, ही मानसिक आरोग्य चांगले असण्याची लक्षणे आहेत. पण हे आरोग्य टिकून रहावे म्हणून पुरेसा व वेळेत आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, चांगल्या सवयी लावून घेणे, काळजी कमी करणे या गोष्टी प्रत्येकाने केल्या पाहिजेत.''

एप्रिल महिन्यात सर्व शाखांमधील १० वीच्या, ६१ विद्यार्थ्यांची कल चाचणी परीक्षा झाली. यातील ५० जणांचे रिपोर्ट मे महिन्यात दिले. त्याचबरोबर मुलांचे पालकांबरोबर वैयक्तिक समुपदेशन झाले. त्यातील काही अभिप्राय –

◆ सार्थक फाले (विद्यार्थी) – कल चाचणी परीक्षेच्या दिवशी झालेल्या सर्व सत्रांतून करियरसंबंधी उत्तम मार्गदर्शन झाले. कल चाचणीचा निकाल योग्य वेळी मिळाल्याने करियर बाबतीत निर्णय लवकर घेणे शक्य झाले आणि यामुळे या परीक्षेचे महत्त्व लक्षात आले.

◆ सौ. अनिता गिरमे (पालक) – स्वामी दयानंद शाखेत माझी मुले जातात. १० वी साठी उपयोगी पडणारे अनेक उपक्रम शाखेत चांगल्या पद्धतीने घेतले गेले. कल चाचणी आणि करियर मार्गदर्शन याचाही चांगला उपयोग झाला. आदित्यने निवडलेल्या करिअर क्षेत्राबद्दल ताईंनी उत्तम मार्गदर्शन केले. यासाठी संस्थेला मनापासून धन्यवाद.

## उत्थान विभाग

**◆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३२ वी जयंती –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त 'पुस्तक विक्री' हा उपक्रम घेण्यात आला. 'कोणतेही पुस्तक १० रुपयात' या उपक्रमामध्ये एक व्यक्ती एक पुस्तक अशा प्रकारे एकूण २५० पुस्तकांची विक्री झाली. यात विविध नेत्यांची, बालकांची, गोष्टींची पुस्तके ठेवण्यात आली होती. लोकांना पुस्तक वाचण्याची आवड निर्माण करणे या उद्देशाने वर्धिनी परिसरातील भीमनगर, जुना बाजार आणि पारगे चौक या ठिकाणी पुस्तक विक्री झाली.

**◆ आरोग्य शिबिर –** उत्थान विभाग, भारतीय संवर्धन संस्था व आरोग्यभारती संयुक्तरित्या जयंती निमित्ताने आंबेडकर सेवावस्तीमध्ये आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये प्रामुख्याने वस्तीमधील गरजू व्यक्तींसाठी विविध तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये नेत्र तपासणी, शुगर तपासणी, HB तपासणी झाली. ६५ लोकांनी याचा लाभ घेतला.

**◆ उन्हाळी सुट्टीतील उपक्रम 'विज्ञानाचा आविष्कार' –**
महात्मा फुले भागातील अभ्यासिकांमधील मुलांसाठी उन्हाळी सुट्टीमध्ये विज्ञान विषयाचे प्रयोग दाखविण्यात येत आहेत. यामध्ये ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचा एक गट आठवड्यातून एकदा प्रयोग दाखविण्यासाठी येत आहे.


त्यातील अभिप्राय – कालचे सत्र खूपच उत्तम झाले. काल अभ्यासिकेवर आलेला गट हा नवीन होता. मुलांचा सहभाग खूप छान होता. मुले छान उत्तर देत होती. त्याच्यामुळे सत्र अजूनच चांगलं होण्यामध्ये मदत झाली. गटातील विद्यार्थ्यांना खेळातून त्यांच्यातील गुण व दुर्गुण समजले. त्यासोबत सत्र घेणाऱ्यांना मुलांना कसे समजवायचे, एखादा वर्ग कसा घ्यायचा हे चांगले समजले. अशीच सत्रे अभ्यासिकेवरती घेण्याची पुन्हा संधी मिळावी अशी आशा.

– अविष्कार भिंताडे, ज्ञानसेतू कार्यकर्ता,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

**◆ शैक्षणिक शिष्यवृत्ती –**
विभागातील अभ्यासिकांमधील हुशार व गरजू विद्यार्थ्यांसाठी RSB Foundation यांच्यामार्फत एकूण ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. हे विद्यार्थी विविध अभ्यासिकांमधील असून त्यांना सल्ला व मार्गदर्शन केंद्रामधील श्रीमती हेमांगी ठाकूर यांच्या हस्ते धनादेश दिले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी याचे सहाय्य निश्चित होईल.

◆ **सुट्टीतील विशेष उपक्रम –**

◆ गुरुकुल अभ्यासिकेत '१ मे – महाराष्ट्र दिन व कामगार दिन' याची माहिती मुलांना सांगितली. ◆ समता भूमी अभ्यासिकेत मुलांनी 'टाकाऊतून टिकाऊ' – भेटकार्ड व कागदी वस्तू बनवल्या. ◆ शिवराय अभ्यासिका व भवानी माता संस्कार वर्गात चित्रकला स्पर्धा झाली. ◆ सर्व अभ्यासिकेतील मोठ्या गटातील मुलींना 'त्रिवेणी'नाटक दाखवले. स्वा. सावरकरांच्या कुटुंबातील तीन स्त्रियांचे कौटुंबिक जीवनातील व स्वातंत्र्य चळवळीतील समर्पण, काही नाट्यप्रसंग, नृत्य, गीते यातून माहीत झाले.












## ◆ अभिनंदन ◆

वर्धिनीतील सर्व शाखांमधील एकूण ५७ विद्यार्थी १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यातील –

प्रथम क्रमांक – कु. प्रांजल भिडे – ९२.६%, द्वितीय क्रमांक – कु. जान्हवी परदेशी – ९०.६% (दोघी भगिनी निवेदिता शाखा)

तृतीय क्रमांक – कु. निशांत गायकवाड – ९०.४% (धर्मवीर शंभूराजे शाखा)

स्पर्धा परीक्षा केंद्र, उत्कर्ष क्रीडा मंडळ व 'स्व'-रूपवर्धिनी संचलित अण्णाभाऊ साठे अभ्यासिकेतील यशस्वी विद्यार्थी –

१) मुंबई पोलिस – श्री. राहुल कांबळे, श्रीमती मेघा पवार, श्री. करण व्यवहारे, श्री. सागर पटेकर, श्रीमती प्राजक्ता कोळेकर.

२) उपजिल्हाधिकारी – श्री. विशाल यादव, श्री. विकास व्यवहारे

३) मुख्याधिकारी – श्री. सागर मुळीक, श्री. यमाजी धुमाळ, श्रीमती प्रिया गोरखे

**सर्व वर्धक-वर्धिकांचे, अधिकाऱ्यांचे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.**

# फिरती प्रयोगशाळा व बालवाडी

तारा मोबाईल क्रेचेस या बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या केंद्रांवर जाऊन सलग १० दिवस वेगवेगळ्या ठिकाणी शिबिर झाले. एकूण ४८७ मुलांनी याचा लाभ घेतला.

रोहन बिल्डर, गोयलगंगा, गोदरेज बिल्डर, प्राईड वर्ल्ड सिटी अशा बांधकाम कंपनींच्या कामावर १ ते १० वयोगटातील मुलांचे पाकोळी बालवाडीच्या शिक्षिकांनी गाणी, गोष्टी, खेळ, हस्तव्यवसाय हे उपक्रम तर १० वर्षांपुढील वयोगटासाठी प्रयोगशाळेच्या कार्यकर्त्यांनी विज्ञानाचे प्रयोग, गणितातील गमतीजमती हे उपक्रम घेतले. मुलांचा सर्व ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळाला.





# श्रद्धांजली

- संघ प्रचारक आणि विज्ञानभारतीचे राष्ट्रीय संघटन सचिव **श्री. जयंतराव सहस्रबुद्धे** यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

विज्ञान वारकरी, निघाला वैकुंठी ।
लगबग सुरु झाली, वैकुंठधामी ।।
आलिंगन देण्या, लाडक्या भक्ताला ।
वैकुंठीचा राणा, आतूर झाला ।।
विज्ञान अध्यात्म, भिन्न जरी शब्द ।
अभिन्न एकत्त्व, त्यांचे ठाई ।।
जाणूनी हे मर्म, देह झिजवला ।
राष्ट्रभाव मनोमनी, जागविला ।।

**- श्री. शिरीष पटवर्धन**

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**